महाराष्ट्र शासन

# महाराष्ट्र लोकसेवा आयोग

मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☎२२७९५९००

फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☎२२१०२२२२

Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in


क्रमांक:सीबीटी-०६२२/प्र.क्र.१४/२०२२/३१ दिनांक:- १० जानेवारी, २०२३

## -: प्रसिध्दीपत्रक:-

**विषय: चाळणी परीक्षा - २०२२ प्रवेश प्रमाणपत्राबाबत.**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत दिनांक १९ व २० जानेवारी, २०२३ रोजी नियोजित **विविध विभागातील खाली नमूद सहा** संवर्गाच्या संगणक प्रणालीवर आधारित चाळणी परीक्षेकरीता प्रवेश दिलेल्या उमेदवारांची प्रवेश प्रमाणपत्रे आयोगाच्या ऑनलाईन अर्जप्रणालीच्या https://mpsconline.gov.in संकेतस्थळावरील त्यांच्या खात्यामध्ये उपलब्ध करुन देण्यात येत आहेत:-

| अ.क्र. | पदाचे नाव | जाहिरात क्रमांक | परीक्षा दिनांक व वेळ |
|---|---|---|---|
| १ | सहायक रासायनिक विश्लेषक, सामान्य राज्य सेवा, गट-ब | ३८/२०२२ | दिनांक १९ जानेवारी, २०२३ दुपारी ०२:०० ते ०३:०० |
| २ | दंतशल्यचिकित्सक, सामान्य राज्यसेवा, गट-ब | १४/२०२२ | दिनांक १९ जानेवारी, २०२३ दुपारी ०४:३० ते ०५:३० |
| ३ | सहायक आयुक्त, मत्स्यव्यवसाय/प्रकल्प व्यवस्थापक, दापचारी (तांत्रिक), महाराष्ट्र मत्स्यसेवा, गट-अ | ०३/२०२० | दिनांक २० जानेवारी, २०२३ दुपारी ०२:०० ते ०३:०० सामायिक चाळणी परीक्षा |
| ४ | मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी, मत्स्यव्यवसाय प्रशिक्षण अधिकारी, अभिरक्षक, प्रशिक्षण व विस्तार अधिकारी (तांत्रिक), महाराष्ट्र मत्स्यव्यवसाय सेवा, गट-ब | ०४/२०२० | |
| ५ | मुख्य प्रशासकीय अधिकारी, सामान्य राज्यसेवा, गट-अ | १०४/२०२१ | दिनांक २० जानेवारी, २०२३ दुपारी ०२:०० ते ०३:०० सामायिक चाळणी परीक्षा |
| ६ | मुख्य प्रशासकीय अधिकारी, सामान्य राज्यसेवा, गट-अ | ८०/२०२२ | |

**२.** परीक्षा कक्षात प्रवेश मिळविण्यासाठी आयोगाच्या संकेतस्थळावरुन डाऊनलोड करुन प्रिंट केलेले मूळ स्वरुपातील प्रवेश प्रमाणपत्र सोबत आणणे अनिवार्य आहे. त्याशिवाय परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

**३.** परीक्षेच्या दिवशी ऐनवेळी उद्भवू शकणा-या अडचणी अथवा आंदोलने, मोर्चे, वाहतूक समस्या, अतिवृष्टी इत्यादी बाबी लक्षात घेऊन, परीक्षा सुरु होण्याच्या वेळेपूर्वी किमान **दीड तास** अगोदर संबंधित परीक्षा उपकेंद्रावर उपस्थित राहणे तसेच, प्रत्यक्ष परीक्षा सुरु होण्याच्या वेळेपूर्वी अर्धा तास अगोदर परीक्षा कक्षातील स्वत:च्या बैठक क्रमांकावर उपस्थित राहणे अनिवार्य आहे.

**४. परीक्षा कक्षातील अंतिम प्रवेशासाठी विहित केलेल्या वेळेनंतर कोणत्याही परिस्थितीत उमेदवारांना परीक्षा कक्षामध्ये प्रवेश दिला जाणार नाही अथवा यासंदर्भात आयोगाची कोणत्याही प्रकारची जबाबदारी राहणार नाही.**

**५.** आयोगाच्या संकेतस्थळावरील 'उमेदवारांना सर्वसाधारण सूचना', प्रवेश प्रमाणपत्रावरील सूचना, परीक्षेच्या वेळी शारीरिक / परस्पर अंतराच्या (Social Distancing) अनुषंगाने करावयाची कार्यवाही / उपाययोजना संदर्भातील सूचना यांचे उमेदवारांनी पालन करणे अनिवार्य आहे. सदर सूचनांचे उल्लंघन करणा-या उमेदवारांवर आयोगाच्या स्वेच्छाधिकारानुसार कारवाई करण्यात येईल. तसेच, प्रचलित नियम / कायद्यातील तरतुदीनुसारही कारवाई करण्यात येईल.

**६.** प्रवेशप्रमाणपत्र मिळण्यात कोणतीही अडचण उद्भवल्यास उमेदवारास आयोगाच्या contact-secretary@mpsc.gov.in किंवा support-online@mpsc.gov.in या ईमेल आणि/अथवा १८००-१२३४-२७५ किंवा ७३०३८२१८२२ या दूरध्वनी क्रमांकावरुन विहित वेळेत आवश्यक मदत प्राप्त करुन घेता येईल.

**७.** संगणक प्रणालीवर आधारित चाळणी परीक्षांकरीता उमेदवारांना सराव करता यावा यासाठी आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावरील 'ONLINE FACILITIES' या मेनूमध्ये 'Computer Based Examinations>Mock Test' येथे एक वेबलिंक उपलब्ध करून देण्यात येत आहे. सदर मॉकटेस्ट ही केवळ सरावासाठी असुन प्रत्यक्ष परीक्षेचा कालावधी व गुण संबंधित परीक्षेच्या परीक्षा योजना व अभ्यासक्रमानुसार असेल.

ठिकाण : मुंबई

सह सचिव, दक्षता, धोरण व संशोधन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग